# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४

E-Mail : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/6652/२०१९

दिनांक ०३/०८/२०१९

प्रति,

मा. प्राचार्य/संस्था चालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय : DBT पोर्टलवर प्रोफाईल व फी अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ : क्र.उशिनाग/शिष्यवृत्ती/४८२९/२०१९, दिनांक ०३/०८/२०१९**

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येत आहे की, संलग्नीत प्रत्र दि. ०३/०८/२०१९ रोजी प्राप्त झाले असून त्या अन्वये कार्यवाही घेण्याकरीता आपल्या अवलोकनार्थ व पुढील कार्यवाहीस संलग्नीत पत्रानुसार घेणे आवश्यक आहे. संलग्नीत पत्रानुसार कार्यवाही न घेतल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी आपली राहील. याची नोंद घ्यावी.

3/8/2019

कुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210


क्रं.उशिनाग/ शिष्यवृत्ती/ ४८२९ /२०१९ दिनांक ०३/०८/२०१९

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर

२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक

३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर

५. संचालक, शास./सर्व प्राचार्य अशासकीय अनु./विना अनु./कायम विना अनु. महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०१९-२० करीता डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल व फी अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :- मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०२०७ दिनांक ३१.७.२०१९**

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विकसीत केलेल्या महाडिबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. ज्यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठ यांची माहिती www.mahadbthamait.gov.in या लिंकद्वारे डीबीटी पोर्टलवर अद्ययावत करणे आवश्यक आहे.

**<u>महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठ यांचेसाठी सूचना :-</u>**

१. महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांनी त्यांचे डीबीटी पोर्टलच्या युजर आय डी. व पासवर्ड च्या आधारे लॉगीन करून महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्ययावत करावयाचे आहे.

२. डीबीटी पोर्टलवर सद्यस्थितीत मागील वर्षाची महाविद्यालयाची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. सदर माहितीमध्ये (महाविद्यालयाचे नाव, पत्ता, अभ्यासक्रम इ.) काही बदल असल्यास त्यामध्ये सुधारणा करण्याबाबतची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३. महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीन मध्ये महाविद्यालयाची माहिती अद्ययावत करणेची सुविधा देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये महाविद्यालयात नवीन सुरू झालेला अभ्यासक्रम Add करणे तसेच महाविद्यालयाच्या लॉगीनवर अनावश्यक/ दुबार नोंदणी झालेल्या अभ्यासक्रमाचे नाव वगळण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४. महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमास शासनाची मान्यता असणे आवश्यक असून, सदरची कागदपत्रे मान्यतेसाठी डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.

५. शासन/ विद्यापीठ यांनी निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणेच महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रमाचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच शुल्क निश्चितीबाबतची कागदपत्रे पडताळणीसाठी डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालयाने पोर्टलवर अद्ययावत केलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क या माहितीच्या आधारेच शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात येणार असल्यामुळे सदरची माहिती अचूक नमूद करणे आवश्यक आहे.**चुकीची अथवा जास्तीची फी नमुद केल्यास त्याची जबाबदारी संबधीत विद्यापीठ/महाविद्यालयाची राहील.**

७. प्रोफाइल व फी अद्यावत करण्याची कार्यवाही प्राचार्य लॉगीन मधुन करणे आवश्यक आहे.

८. महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबतची माहिती दि. १०.०८.२०१९ पर्यंत भरून त्यास संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

९. महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील शुल्काबाबतची माहिती भरतांना अभ्यासक्रमाचा जेवढा कालावधी असेल त्यापेक्षा दोन वर्ष अधिक कालावधीचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे.

१०. तसेच डीबीटी पोर्टल संदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या Grievance या लिंकच्या आधारे ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यात याव्यात व त्या सोडविल्याची त्वरीत खात्री करून घेण्यात यावी.

११. महाविद्यालयांनी इन्स्टियुट प्रोफाईल अद्ययावत करणेसाठी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या व्हिडीओ व मॅन्युअल पाहून त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास त्यांच्या अडचणी व शंकाचे निरसन होईल.

**तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे आपले विद्यापीठ/महाविद्यालयाचे सन २०१९-२० साठी प्राफाईल व फी अद्यावत करुन महाविद्यालयाची शासन मान्यता प्रत, विद्यापीठ सलंग्नता, विद्यापीठ/शुल्क समिती ने निर्धारीत केलेल्या फी बाबतच्या माहीतीसह या कार्यालयाकडून मान्यता घेण्यासाठी दिनांक १०/०८/२०१९ पर्यत न चुकता उपस्थित राहावे. यामध्ये कोणताही विलंब झाल्यास अथवा पात्र विद्यार्थी वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठ/महाविद्यालयांच्या प्राचार्य यांची राहील.**

(डॉ. अर्चना नेरकर)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.